<u>गोपनीय</u>

**क्रमांक : का.स./बैठक/२५९**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १० ऑक्टोबर, २०१८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या २५९व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१०/१०/१८
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. जयंत कुमार बांठिया
१००३/१००४, १० वा मजला,
बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),
मुंबई – ४०० ०५३ - सदस्य

श्री. ना. वि. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५९वी बैठक

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **०५ सप्टेंबर, २०१८ (बुधवार)** |
| **वेळ** | : | **दुपारी ४.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. डी.के.जैन<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.लोकेशचंद्र<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. यु.पी.एस.मदान
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा.भा.गाडगे
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. डी.टी.ठुबे,
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. शंकर देशपांडे
प्रमुख (अ.का.), न. व क्षे. नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. मो.गु.सोनार
प्रमुख (अ.का.), नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. डि.एल.एन.मूर्ति,
प्रमुख (अ.का.), प. व द. विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती नी.रा.मसुरकर
मुख्य लेखा परिक्षण अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय कृ. नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दे.स.पाटोळे
प्रशासकीय अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी श्री. डी.के.जैन, मा.मुख्य सचिव यांचे कार्यकारी समितीचे नवे "अध्यक्ष" व श्री.लोकेशचंद्र, व्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि श्री. जयंत कुमार बाँठिया यांचे 'सदस्य' तसेच श्री.यु.पी.एस.मदान, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे 'स्थायी निमंत्रित' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री.द.म.सुकथनकर यांनी कार्यकारी समितीचे "तज्ञ सदस्य" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला व ठराव मंजूर करण्यात आला. **(जोडपत्र)**

तसेच, श्री.भूषण गगराणी, माजी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी कार्यकारी समितीचे "पदसिध्द सदस्य" व श्री.डी.के.जैन, माजी अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांनी "पदसिध्द निमंत्रित" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या २५८व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र..२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या २५८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग ७, अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) मार्गिकेच्या Ballastless Track साठी संरचना (डिझाईन), बांधकाम, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी व मार्ग कमिशनिंग करणे (पॅकेज सी.ए.२१) या कामाकरिता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की,

मेट्रो मार्ग - ७, अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) मार्गिकेचे स्थापत्य बांधकाम प्रगतिपथावर आहे. या मार्गाकरिता Ballastless रेल्वे मार्गासाठी संरचना (डिझाईन), बांधकाम, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी व मार्ग कमिशनिंग करणे (पॅकेज - सी.ए.२१) या कामाकरिता ई-निविदा मागविण्यासाठी वृतपत्रांमध्ये ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार दि. ०८.०६.२०१८ रोजी दु. ३.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष लिफाफा-अ (निविदा इसारा किंमत) उघडण्यात आला. मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. आणि Consortium of मे. टेक्समॅको रेल अॅन्ड इंजिनिअरींग लि. व मे. अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लि., या दोनच निविदाकारांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला. महाराष्ट्र शासन निर्णय संकिर्ण २९१७/सी.आर.१२१(भाग २)/इमारत-२ दि. १९ सप्टेंबर, २०१७ नुसार कमीत कमी ३ तांत्रिकदृष्टया सक्षम देकार असणे आवश्यक आहे. परंतु केवळ दोनच निविदा प्राप्त झाल्याने प्राधिकरणाने वरील २ निविदाकारांचे लिफाफा-ब (तांत्रिक प्रस्ताव) न उघडता सदर निविदा रद्द करुन फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मेट्रो मार्ग ७ च्या पॅकेज सी.ए.-२१ साठी फेर ई-निविदा मागविण्याकरिता ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक १० जुलै, २०१८ पर्यंत ठेवण्यात आला. प्रचलित पध्दतीनुसार दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष लिफाफा-अ (निविदा इसारा किंमत) व ब (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आला. खालील दोन निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या:-

१. मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि.
२. Consortium of मे. टेक्समॅको रेल अँड इंजिनिअरींग लि. आणि मे. अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लि.

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी, प्रकल्पाच्या सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सर्वसाधारण सल्लागाराने सादर केलेल्या अहवालानुसार वरील दोन्ही निविदाकार पात्र आहेत. वरील तांत्रिक छाननी अहवालास अतिरिक्त महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीने मान्यता दिली. त्यानुसार पॅकेज सी.ए. २१ अंतर्गत तांत्रिकदृष्टया पात्र २ निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा क – आर्थिक प्रस्ताव) दिनांक २६ जुलै, २०१८ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी

समक्ष उघडण्यात आले. त्यानुसार निविदाकारांचा प्राप्त देकार खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | निविदाकाराचे नांव | निविदाकाराचा एक रकमी देकार (Amount quoted by Tenderer in Lumpsum Component) | | अस्थायी रक्कम (Provisional sum component) | निविदाकारांचा अनुसूची ('अ'+'ब') एकूण देकार (रु) (Total of Sch. A & B as per Tenderer's quoted price in INR) | स्थिती (Position) | % अंदाज-पत्रकीय किमतीच्या अधिक/ कमी (Above/ Below /At par w.r.t. Estimate) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचि "अ" (रु.) {Schedule 'A' (INR)} | अनुसूचि'अ' (वि.च.) {Schedule' Ä' (Foreign currency *)} | अनुसूचि "ब" {Schedule 'B' (INR)} | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. | १०१,४८,३४,५२० | १०,२१,००० (युरो) | ६०,००,००० | ११०,३४,१३,००० | L१ | ६.२१% |
| २ | Consortium of मे. टेक्समॅको रेल अॅन्ड इंजिनिअरींग आणि मे. अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लि. | १०३,४१,१४,०३४ | $ १६७६०२६ US | ६०,००,००० | ११५,४०,००,००० | L२ | ११.०८% |

***Conversion rate: 1 USD = 67.95 INR, 1 EURO = 80.88 INR (Dated 12.06.2018) as per Clause of E5.3 of ITT (SBI selling Rate of Exchange considered) for Bid evaluation.**

उघडलेल्या सर्व-२ ई-निविदांची आर्थिक छाननी मेट्रो - ७ प्रकल्पाच्या सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सर्वसाधारण सल्लागाराने दिनांक ३० जुलै, २०१८ रोजी आर्थिक छाननी अहवाल प्राधिकरणास सादर केला त्यानुसार पॅकेज सी.ए.-२१ मध्ये मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. यांचा रु. १०१,४८,३४,५२० + युरो १०,२१,००० (रु. ११०,३४,१३,०००/-) सर्व करासहित रक्कमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय रु. १०३.८९ कोटीच्या किंमतीपेक्षा ६.२१% जास्त आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सर्वसाधारण सल्लागाराने लघुत्तम देकाराच्या दरांकरिता संभाव्य कारणांचे विश्लेषण करतांना असे नमूद केले आहे की, अंदाजपत्रकीय रु. १०३.८९ कोटीच्या किंमतीत कस्टम डयुटीचा समावेश नाही परंतु लघुत्तम देकारात मात्र कस्टम डयुटीचा समावेश आहे (अंदाजे १.३%). तसेच अंदाजपत्रकातील किंमतीचे दर हे लखनौ मेट्रो रेल्वेच्या डिसेंबर, २०१५ वर आधारीत असून हया दरांमध्ये डिसेंबर, २०१७ पर्यंत वृध्दी घेण्यात आली असून जानेवारी, २०१८ ते जून, २०१८ पर्यंतचा वाढीव दर अंदाजे २.५% इतका आहे. तसेच अंदाजपत्रकातील किंमतीत युरोचा दर रु.७८.०० धरला असून सद्य

निविदेत तो रु.८०.८८ इतका होता, ज्यामुळे अंदाजपत्रकातील किंमतीवर अंदाजे ०.७% इतका परिणाम होईल. सर्वसाधारण सल्लागाराने असेही नमूद केले आहे की, भारतात चालू असलेल्या विविध मेट्रो/रेल्वे आदी प्रकल्पांमुळे कुशल मजूरांची कमतरता आहे आणि विशेषत: मुंबईत ते एकत्रित व तैनात करणे कठीण होईल. तसेच लखनौ आणि मुंबईतील कामांची परिस्थिती वेगवेगळी असून वरील सर्व बाबी लक्षात घेता लघुत्तम निविदा रास्त व स्विकाहार्य असल्याची शिफारस केली. त्याप्रमाणे सर्वसाधारण सल्लागार यांनी सादर केलेला आर्थिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीने दि. ०१.०८.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्य करुन निविदाकार मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. यांचा लघुत्तम देकार स्विकारण्याची शिफारस केली.

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, वरील सर्व बाबींचा विचार करता पॅकेज - सी.ए. -२१ करिता मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. यांचा रु. १०१,४८,३४,५२० + युरो १०,२१,००० (रु. ११०,३४,१३,०००/-) सर्व करांसहित अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ६.२१% ने जास्त असलेला लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा रास्त व वाजवी असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३५६ :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए.-२१ साठी मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. यांचा रु. १०१,४८,३४,५२० + युरो १०,२१,००० (रु. ११०,३४,१३,०००/-, रु. एकशे दहा कोटी चौतीस लाख तेरा हजार फक्त) सर्व करांसहित रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : संत गाडगे महाराज चौक-वडाळा-चेंबूर या मार्गावर सार्वजनिक वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार मे. लूईस बर्जर ग्रुप यांना वाढीव मुदत नोव्हेंबर, २०१७ ते डिसेंबर, २०१८ आणि त्यासाठीच्या रू. ८.०९ कोटीच्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी २० कि. मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक – वडाळा – चेंबूर या मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्पाची सद्यस्थितीबाबत माहिती देताना असे सांगितले की, सदर प्रकल्पाच्या कामावर देखरेख करण्याकरीता मे. लूईस बर्जर ग्रुप या कंपनीस प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून दिनांक २८ मे, २००९ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २२७व्या बैठकीत ठराव क्र. ११३१ अन्वये ३० महिन्यासाठी रु. ३५,११,५०,०००/- (रु.पस्तीस कोटी अकरा लाख पन्नास हजार) अधिक सेवा कर एवढ्या रक्कमेस मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्पाच्या करारनाम्यानुसार बांधकामाचा कालावधी ३० महिने इतका असून प्रकल्प माहे मे, २०११ अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. करारानुसार प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांची नियुक्ती माहे जून, २००९ पासून ३० + ३ = ३३ महिने (अतिरिक्त शुल्काव्यतिरिक्त) गृहित धरता प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा कार्यकाळ माहे फेब्रुवारी, २०१२ पर्यंत पूर्ण झाला. परंतू, सदर प्रकल्प ठराविक वेळेत पूर्ण करण्यास कंत्राटदारास विलंब झाला. त्याअनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांच्या वाढीव कालावधीकरीता लागणाऱ्या खर्चास वेळोवेळी कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आली.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मोनोरेल टप्पा -१ वडाळा ते चेंबूर या मार्गिका दिनांक २ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवाशी वाहतूकीसाठी खुली करण्यात आली. आजतागायत, प्राधिकरणाने मे. लुईस बर्जर ग्रुप यांची सेवा मागील मान्य झालेल्या कंत्राट दराप्रमाणे सुरु ठेवल्या आहेत. मोनोरेल प्रकल्प टप्पा- १ ची सेवा माहे नोव्हेंबर, २०१७ पासून ठप्प पडलेली आहे. सदर सेवा माहे सप्टेंबर, २०१८ पासून पूर्ववत करण्याचे निर्देश कंत्राटदारास (LTSE) दिले आहेत. टप्पा -२ मार्गिकेचे स्थापत्य व कार्यान्वयनाचे काम माहे मार्च, २०१८ मध्ये पूर्ण झाले आहे. त्यानंतर ट्राम-वे अधिनियमांतर्गत अभियंता (आयुक्त,रेल्वे सुरक्षा ) यांनी प्रकल्पाचे परिक्षण व पाहणी माहे मार्च,२०१८ मध्ये केली. त्याअनुषंगाने काही अटींच्या अधिन राहून अभियंता यांनी दिनांक ८ एप्रिल,२०१८ रोजी टप्पा -२ या मार्गिकेला प्रमाणपत्र दिले. प्राधिकरणाने टप्पा-२ प्रवासी वाहतूक सूरू करण्याचा प्रस्ताव मान्यतेकरीता

शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. सदर अभियंत्याच्या परिक्षणात व शासन मान्यतेच्या कामात सल्लागाराने वेळोवेळी सहकार्य केले.

४.३ महानगर आयुक्त यांना पूढे असे सांगितले की, सदर कामावर देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार, मे. लुईस बर्जर ग्रुप यांनी (१४ महिन्यांसाठी – नोव्हेंबर, २०१७ ते डिसेंबर, २०१८ पर्यंत) रु. १०,५६,७३,७५०/- (रु. दहा कोटी छप्पन्न लाख त्र्याहत्तर हजार सातशे पन्नास) इतक्या रक्कमेचा प्रस्ताव दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी प्राधिकरणास सादर केला. सदर प्रस्तावाची छाननी करण्यासाठी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

समितीच्या शिफारसीप्रमाणे मोनोरेल टप्पा १ व टप्पा २ चालविण्यासाठी व देखरेखीसाठी सल्लागाराची आवश्यकता भासणार आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करुन समितीने सल्लागारास माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची शिफारस केली, शिवाय समितीने मनुष्यबळ महिन्या (Man months) मध्ये कामाच्या स्वरुपानुसार फेरफार करुन सल्लागारास माहे नोव्हेंबर, २०१७ पासून डिसेंबर, २०१८ (१४ महिने) पर्यंत रु. ८,०९,५६,८७५/- (रु. आठ कोटी नऊ लाख छप्पन हजार आठशे पंच्याहत्तर) एवढी रक्कम देण्यासाठी शिफारस केली आहे.

**समितीने शिफारस केलेल्या रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे -**

| अ.क्र. | कालावधी | मनुष्यबळ महिने | देय रक्कम |
|---|---|---|---|
| **भाग १** | माहे नोव्हे, २०१७ ते माहे एप्रिल, २०१८ (कार्योतर मुदतवाढ ६ महिने ) | ९४.२५ | रु. ४,२८,१५,०००/- |
| **भाग २** | माहे मे, २०१८ ते माहे डिसेंबर, २०१८ (नियमित मुदतवाढ ८ महिने ) | ७१.०० | रु. ३,८१,४१,८७५/- |
| **एकूण** | नोव्हे, २०१७ ते डिसेंबर, २०१८ (१४ महिने) | १६५.२५ | रु. ८,०९,५६,८७५/- |

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर समितीच्या अहवालानुसार सद्य:स्थितीत मे. लुईस बर्जस ग्रुप यांची सेवा मागील वर्षभरापासून मुदतवाढ न करता घेतल्याने नोव्हेंबर, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधी करीता रु. २,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) इतकी अंतरिम रक्कम अदा करण्यात आली तसेच सल्लागारावर समितीने आकारलेल्या दंड रक्कमेवर वेगळी कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

४.५ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा दुसरा टप्पा (वडाळा ते संत गाडगे महाराज) माहे जानेवारी, २०१९ पर्यंत सुरु करण्यासाठी कंत्राटदारास निर्देश दिले आहेत व मुंबई मोनोरेल प्रकल्पाचे कार्यान्वयन व देखभाल (O&M) या कामाकरीता नवीन सल्लागार नेमण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरु असून प्राधिकरणास सद्य:स्थितीत मे. लुईस बर्जस ग्रुप या सल्लागाराची गरज पडणार आहे. त्यानुषंगाने मे. लुईस बर्जर ग्रुप यांची सेवा माहे डिसेंबर, २०१८ नंतर पुढील कालावधीकरीता प्रो रेटा तत्वावर वाढविण्याचे अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे.

४.६ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, वरील सर्व गोष्टीचा विचार करता, मे. लुईस बर्जर ग्रुप आय. एन.सी. (USA) यांना माहे नोव्हेंबर, २०१७ ते डिसेंबर, २०१८ (१४महिने) पर्यंत देय असणारी रक्कम रु. ८,०९,५६,८७५/- (रु.आठ कोटी नऊ लाख छप्पन हजार आठशे पंच्यात्तर) इतकी वाजवी आणि रास्त आहे. तसेच कार्यकारी समितीच्या २४२व्या बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रकल्पाच्या वाढीव कालावधीकरिता प्रकल्प सल्लागाराला ७०% फी प्रत्यक्ष मनुष्यबळानुसार (Actual man month basis) आणि ३०% फी ही प्रकल्पाच्या वित्तीय प्रगतीनुसार देण्यात येईल.

**निर्णय :** **त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १३५७</u> :-**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे, मुंबई मोनोरेल प्रकल्पाच्या कामासाठी नेमणूक केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार, मे. लुईस बर्जर ग्रुप यांना माहे नोव्हेंबर, २०१७ ते डिसेंबर, २०१८ (१४ महिने) या वाढीव कालावधीकरीता मान्यता देत आहे. तसेच, सदर वाढीव कालावधीसाठी रु. ८,०९,५६,८७५ (रु. आठ कोटी नऊ लाख छप्पन हजार आठशे पंच्याहत्तर) अधिक वस्तू व सेवा कर (GST) इतक्या खर्चास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** मे. लुईस बर्जर ग्रुप यांना माहे नोव्हेंबर, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधी करीता रु. २,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) इतकी

.. १०/-

अंतरिम देय रक्कम महानगर आयुक्त यांच्या परवानगीने अदा करण्यात आली आहे. सबब सल्लागारास देय असलेल्या रक्कमेतून रू. २,००,००,०००/- वजा करण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा दुसरा टप्पा (वडाळा ते संत गाडगे महाराज) माहे जानेवारी, २०१९ पर्यंत सुरु करण्याच्या दृष्टीने सल्लागाराची गरज पडणार आहे. त्या अनुषंगाने मे. लुईस बर्जर ग्रुप यांची सेवा माहे डिसेंबर, २०१८ नंतर पुढील कालावधीकरीता गरज भासल्यास, प्रो रेटा तत्वावर मुदत वाढविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यासाठी मान्यता देत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ऐरोली पुल ते ठाणे-बेलापूर रस्ता दरम्यानच्या उन्नत रस्त्याच्या संकल्पचित्र व बांधकाम (Design Built) तत्त्वावर ठोक रक्कम पध्दतीवर बांधकाम करणे – सुधारित प्रशासकीय मान्यता लघुत्तम निविदा स्विकारणे बाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले व त्यात ऐरोली कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव असून प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने आखणी मार्ग तीन भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग क्र. १ ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा आहे. त्यासाठीच्या बोगदा व उन्नत मार्गाच्या कामासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून काम प्रगती पथावर आहे.

५.२ सदर बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता असा विषय नमुद केल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. परंतु सदर प्रकल्पास एकूण रु. ९४४.२० कोटीची मुळ प्रशासकीय मान्यता असून प्रशासकीय दृष्टीकोनातून सदर कामांची तीन भागात विभागणी करण्यात आली असून सद्य:स्थितीत सर्व भागांसाठीचा एकूण खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा कमी असल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता नसल्याचे सांगितले. या अनुषंगाने सुधारित प्रस्ताव व ठरावाची प्रतही बैठकीत सादर करण्यात आली.

५.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या कामातील भाग-२ मधील उन्नत मार्ग ज्याची रॅम्पसहित लांबी २७५७ मीटर असून या कामाकरीता रु. २२३.५६ कोटी या अंदाजित रक्कमेच्या कामासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेच्या प्रतिसादार्थ प्राप्त झालेल्या देकारांचा लिफाफा-अ उघडला असता एकूण तीन निविदाकारांनी त्यांचा देकार सादर केल्याचे दिसून आले. सर्व निविदाकारांनी निविदेतील अटींची पूर्तता केली असल्यामुळे त्यांचे लिफाफा-ब उघडण्यात आला. लिफाफा-ब मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी प्रकल्पाचे सल्लागार मे. स्टुप कन्संल्टंट प्रा. लि. यांचेतर्फे करण्यात आली व त्यानुसार सादर झालेला अहवाल दिनांक १०.०७.२०१८ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत सादर करण्यात आली. निविदा शिफारस समितीच्या शिफारसीनंतर तीनही निविदाकारांचे आर्थिक देकार दिनांक १७.०७.२०१८ रोजी उघडण्यात आले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. | रु. २७७,००,००,०००/- | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. जे. एम. सी. प्रोजेक्टस् (इंडिया) प्रा. लि. | रु. २९९,४०,००,०००/- | तृतीय लघुत्तम |
| ३ | मे. एन. सी. सी. लि. | रु. २९३,२४,००,०००/- | व्दितीय लघुत्तम |

५.४ महानगर आयुक्तांनी असे नमूद केले की, वरील तपशिलानुसार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांचा रु. २७७.०० कोटी किंमतीचा आर्थिक देकार लघुत्तम आढळून आला. लघुत्तम देकार हा अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त असल्यामुळे दिनांक २३.०७.२०१८ रोजी निविदा शिफारस समितीची बैठक घेऊन निविदाकाराकडून त्याच्या देकाराबाबत समर्थन घेण्याचे ठरले. त्यानुसार निविदाकाराने सादर केलेल्या समर्थनाची प्रकल्पाच्या सल्लागारामार्फत छाननी करण्यात आली. छाननी नुसार कामाचे अंदाजपत्रक हे सन २०१७-१८ च्या दरसुचिवर आधारित

असून त्यात जीएसटी कराचा समावेश नसून निविदाकाराने जीएसटी समवेत देकार सादर केलेला होता त्यानुसार जीएसटी करापोटी १२% विचारात घेता अंदाजपत्रकीय रक्कम रु. २५०,३९,५९,५९२/- (मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. २२३.५६ कोटी अधिक १२% जीएसटी) इतकी होते. तसेच निविदाकाराने दिलेल्या समर्थनाच्या अनुषंगाने व सल्लागाराने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने खाली नमुद केलेल्या बाबींचा मूळ अंदाजपत्रकात अंतर्भाव नसल्याने त्या विचारात घेणे संयुक्तिक होते :-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाचे कामाकरीता लागणार कास्टींग यार्डचे विकसन व त्यापोटी जमिन भाडे | रु. ११.२५ कोटी |
| २) | प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर निविदाकारास ५ वर्षाचा देखभाल दुरुस्तीच्या काळातील लागणारा अपेक्षित खर्च | रु. ५.०३ कोटी |
| ३) | कंत्राट संकल्पचित्र व बांधकाम (Design Built) तत्वावर ठोक रक्कम पद्धतीचे असल्यामुळे कंत्राटदारास पूलाचे संकल्पचित्राकरीता करावा लागणारा खर्च (RCC Design) | रु. २.२३ कोटी |

५.५ महानगर आयुक्तांनी पुढे असे नमूद केले की, मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या बाबींचा विचार केला असता कामाची एकूण रक्कम रु. २६८,९१,१९,१३४/- इतकी होते. याबाबत सल्लागाराने केलेल्या शिफारशीस दिनांक २९.०८.२०१८ रोजीच्या निविदा शिफारस समितीचे बैठकीत शिफारस करण्यात आली. तसेच सदर रक्कम व निविदाकाराचा देकार यातील तफावत पाहता बैठकीत निविदाकारास वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले. सदर वाटाघाटी दरम्यान निविदाकाराने सुचित केल्याप्रमाणे दरसुची व प्रचलित बाजार दर यातील तफावत रेल्वेच्या मान्यतेनुसार व त्याच्या निरीक्षणाखाली करावयाचे रेल्वे वरील पुलाचे काम, खाडीतील काम, वाहतुक विभागाशी समन्वय ठेवतांना येणारा बॅरेकेटस्, माहिती फलक, वार्डन्स, इ. वरील खर्च हा अतिरिक्त खर्चास कारणीभूत होतो असे नमूद केले. परंतु निविदा शिफारस समितीने वाटाघाटी करण्यास सांगितले असता निविदाकाराने त्याच्या पत्र क्र. JKIL/MMRDA/Tender/230/2018 दिनांक २९.०८.२०१८ नुसार रु. २७५,९०,००,०००/- इतक्या रक्कमेत काम पूर्ण करण्याचे मान्य केले. या अनुषंगाने गठीत निविदा शिफारस समितीच्या दिनांक ३०.०८.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांच्या रु. २७५,९०,००,०००/- इतक्या रक्कमेची निविदा स्वीकृत करण्याबाबत शिफारस करण्यात आली.

५.६ महानगर आयुक्तांनी सादर केलेल्या माहितीवर सदस्यांनी चर्चा करून दर सुचीमध्ये समावेश नसलेल्या सदरच्या बाबींबाबत भविष्यात अंदाजपत्रकात शिफारस करण्याविषयी सूचीत करण्यात आले. तसेच मा.अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वर नमूद केलेल्या तिन्ही बाबींबाबत सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतेवेळी वापरलेल्या दरसूचीमध्ये तरतूद नसल्याचे अधिन राहून मान्यता देण्याविषयी नमूद केले. चर्चेअंती सादर करण्यात आलेल्या सुधारित प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांचा लघुत्तम व वाटाघाटी पश्चातचा रु. २७५,९०,००,००००/- चा देकार निविदेतील अटी व शर्तींची पूर्तत: करणारा व सुसंवादित असल्याने चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**निर्णय:-** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>**ठराव क्र. १३५८**</u> :-

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ऐरोली पुल ते ठाणे - बेलापूर रस्ता दरम्यानच्या उन्नत रस्त्याच्या संकल्पचित्र व बांधकाम (Design Built) तत्त्वावर ठोक रक्कम पध्दतीवर बांधकाम करावयाच्या प्रस्तावित कामासाठी मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांचा लघुत्तम देकार असलेली निविदा ज्याची वाटीघाटी पश्चात रक्कम रु. २७५,९०,००,०००/- (रुपये दोनशे पंच्याहत्तर कोटी नव्वद लाख फक्त) इतकी असून ती स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणारी भाववाढ इ. अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.६ :** **<u>मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) आणि मुख्य अभियंता (रेलपथ) या पदांच्या सेवाप्रवेश नियमात बदल करणेबाबत.</u>**

६.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीमध्ये मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता निर्माण करण्यात आलेल्या सदर पदांपैकी मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) वेतनश्रेणी पीबी IV रु.३७४०० – ६७००० + ग्रेड वेतन रु.८९००/- या पदाच्या सेवाप्रवेश नियमास कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४व्या बैठकीत मंजूरी देण्यात आली होती.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) संवर्गात मंजूर असलेले १ पद आणि मुख्य अभियंता (रेलपथ) संवर्गात मंजूर असलेले १ पद भरण्याकरीता दोन वेळा जाहिरात देण्यात आली होती. मात्र दोन्ही वेळी पुरेसा व योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर पदे अद्याप रिक्त आहेत. या दोन्ही पदांकरीता लागणारा विशिष्ट अनुभव विचारात घेऊन आणि रेल्वे प्रशासनातील कर्मचारीवृंद आकृष्ट करण्याच्या दृष्टीने या पदांच्या सेवाप्रवेश नियमातील अर्हतेमध्ये बदल करुन सदर पदांकरीता विर्निदिष्ट वेतनश्रेणीतील अनुभव अंतर्भूत करण्यात आला आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) आणि मुख्य अभियंता (रेलपथ) या वेतनश्रेणी पी.बी. IV ३७४००-६७००० + ग्रेड पे रु.८९००/- मधील पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये करण्यात आलेल्या बदलास मान्यता घेण्याकरीता कार्यकारी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**निर्णय :-** **<u>बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १३५९ :-</u>**

**"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन

.. १५/-

प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) आणि मुख्य अभियंता (रेलपथ) या वेतनश्रेणी पी.बी. IV ३७४००-६७००० + ग्रेड पे रु.८९००/- मधील पदांच्या सेवाप्रवेश नियमाच्या अनुभवाच्या अर्हतेमध्ये बदल करुन खालील सुधारीत सेवाप्रवेश नियमास मंजूरी देण्यात येत आहे :-

**Chief Engineer (Signalling & Telecommunication)**
**Rs.37,400-67,000 (GP 8900)**
**Appointment shall be made either :-**

a. By Promotion of a suitable candidate on the basis of selection from amongst the Additional Chief Engineer in MMRDA who possess Degree of a statutory university in Electronics/Electronics and Telecommunication Engineering and experience as mentioned in (c) below

Or

b. By deputation from Government Department or Semi-Govt organization including public sector undertaking, if they possess the qualifications and experience prescribed in (c) below

Or

c. By selection from amongst the candidate who possess the following :-

**Educational Qualification :-**
Degree in Electronics/Electronics and Telecommunication Engineering from a Recognized and reputed University/Institute.

**Experience :-**
Appointment shall be made of a suitable candidate as below –
Candidate should be working in PB-4 of CDA Grade of Rs.37400-67000 with GP – Rs.8700 **SG/IRSSE Officer of Railway Service** for a minimum period of 2 years or PB-3 pay scale Rs.15600-39100 with GP – Rs.7600 **JAG/IRSSE Officer of Railway Service** working with **5 years** service in Group A in CDA scale or equivalent scale alongwith 18 years length of service with "desirable" experience given below –

OR

Total minimum 18 years experience in executive grade in Govt. entities like BSNL/MTNL etc. in "desirable" domain for the post

OR

Total minimum 18 years experience in reputed Private Sector in executive grade in "desirable" domain for the post.

OR

SAG/Non functional (NF) – SAG, of IRSSE (Indian Railways Service of Signal Engineers) Cadre of Indian Railways.

**Desirable :-**

i. Candidate should have experience of working in construction projects of Railways/ Metros/other PSUs/Private Sector dealing with Signalling & Telecommunication.
ii. Candidate should be conversant with international competitive bidding, computerized environment working and latest Signalling & Telecommunication (S&T) Technologies etc.
iii. Adequate experience in planning, designing, supplying, testing & commissioning of Signalling & Telecommunication systems for elevated Metro/Rail Projects in Urban & Suburban environment including consultancy works related to Urban Rail projects.
iv. Candidates with experience of working of modern Urban Rail systems will be preferred.

**Age :-**
No age limit if the post is filled by promotion or by deputation. In case of appointment by selection candidate should Not be more than 55 years. No age limit for MMRDA employees.

**Chief Engineer (Track)**
**Rs.37,400-67,000 (GP 8900)**

Appointment shall be made either :-

a. By Promotion of a suitable candidate on the basis of selection from amongst the Additional Chief Engineer in MMRDA who possess Degree of a statutory university in Civil Engineering and experience as mentioned in (c) below

Or

b. By deputation from Government Department or Semi-Govt organization including public sector undertaking, if they possess the qualifications and experience prescribed in (c) below

Or

c. By selection from amongst the candidate who possess the following :-

**Educational Qualification –**
Degree in Civil Engineering from a Recognized & reputed University/Institute.

**Experience –**
Candidate should be working in PB-4 of CDA Grade of Rs.37400-67000 with GP – Rs.8700 for a minimum period of 2 years or **JAG/SG Officers of Indian Railway Service of Engineers (IRSE) working in PB-III pay-scale Rs.15600-39100 with GP Rs. 7600/- working with 5 years experience in JAG & above** or equivalent scale with "desirable" experience given below –

Or

SAG/Non functional (NF) – SAG, of IRSE (Indian Railways Service of Engineers) Cadre of Indian Railways.

**Desirable –**

i. Candidate should have experience of Construction and Maintenance of Track in Railways/Metro.
ii. Experience of working on projects of stations of Urban Railways/viaduct and bridges/ballast-less track works.
iii. Candidate should be conversant with international competitive bidding, computerized environment working.
iv. Adequate experience in planning, designing, supplying, testing & commissioning of Civil Engineering works for elevated Metro/Rail Projects in Urban & Suburban environment including consultancy works related to Urban Rail projects.
v. Candidates with experience of working of modern Urban Rail systems will be preferred.
vi. Candidate should have experience and knowledge of inter-face with Railway related disciplines such as Track laying works, Signalling, Electrification and Rolling Stock etc.

**Age :** No age limit if the post is filled by promotion or by deputation. In case of appointment by selection candidate should Not be more than 55 years. No age limit for MMRDA employees.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : "प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन" या संवर्गाचे सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**७.१** महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबात माहीती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग"** हे पद दिनांक १.०७.२०१८ रोजीपासून रिक्त आहे. सद्यस्थितीत प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे पद सरळसेवेने अथवा वरिष्ठ नियोजक संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येते. परंतु सन २००७ ते सन

२०१५ या कालावधीत "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)", "अतिरिक्त प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अतिरिक्त प्रमुख (अर्बन डिझाईन)" ही पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत.

**७.२** महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग"** हे पद वरिष्ठ नियोजक या संवर्गातून न भरता "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)", "अतिरिक्त प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अतिरिक्त प्रमुख (अर्बन डिझाईन)" या संवर्गातून या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करीत असलेल्या अधिकाऱ्यास पदोन्नती देऊन भरावयाचे आहे. त्यानुसार **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग"** या पदाचे सेवाप्रवेश नियम सुधारित करावयाचा प्रस्ताव कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात आला आहे.

**निर्णय :-** बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३६० :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या व यासंबधी सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग"** या पदाचे बाब टिप्पणीत उल्लेख केलेल्या खालील सुधारित सेवाप्रवेश नियमास मंजूरी देण्यात येत आहे :-

| **सुधारित सेवाप्रवेश नियम** |
|---|
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील "प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग" या पदावरील नेमणूक सरळसेवेने अथवा पदोन्नतीने, योग्य व्यक्तींच्या सक्त निवडीने अथवा पदोन्नतीने खालील व्यक्तीमधून करण्यात येईल:-<br><br>**शैक्षणिक अर्हता :** १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वास्तुविशारद (बी.आर्च.) **किंवा** स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी **किंवा** तत्सम<br>**आणि**<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठ/संस्थेची नगर नियोजन, नगर रचना किंवा नगर व प्रादेशिक नियोजन मधील पदव्युत्तर पदवी/पदविका.<br><br>**अनुभव :** पदव्युत्तर पदवी धारण केल्यानंतर किमान १५ वर्षे नगर नियोजनाचे कामकाज हाताळण्याचा अनुभव धारण करणाऱ्या व्यक्ती अथवा १० वर्षे जबाबदारीच्या पदावर कामकाज हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती.<br>**किंवा**<br>पी.बी.-४ – रु.३७४००-६७००० + ग्रे.पे.८७००/- या वेतनश्रेणीत कार्यरत असलेले "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)", अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अति.प्रमुख (अर्बन डिझाईन)" या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करीत असलेली व्यक्ती.<br>**वय :** ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यास वयाची अट लागू नाही. |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ एप्रिल, २०१८ ते दिनांक ३० जून, २०१८.**

**८.१** महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाकडे दिनांक १ एप्रिल, २०१८ ते ३० जून, २०१८ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने १ एप्रिल, २०१८ ते ३० जून, २०१८ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय:- सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.९ : दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

**९.१** महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय:- प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.१० : मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ मार्च, २०१८.**

**१०.१** मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ मार्च, २०१८ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय:- प्राधिकरणाच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाच्या नोंदीस कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**पटल बाब क्र. ०१ : कंत्राटदार मे. लार्सन ॲन्ड टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया या समुहाला, मोनोरेल प्रकल्पाच्या कार्यान्वयन व देखभालीकरीता प्रति फेरी रु. १०,६००/- इतका वाढीव दर देण्याबाबत.**

सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी २० कि. मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक – वडाळा – चेंबूर या मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्पाची सद्यस्थितीबाबत

माहिती देताना असे सांगितले की, मुंबई मोनोरेल प्रकल्पाच्या मुळ कत्रांटाप्रमाणे कंत्राटदारास सदर प्रकल्प सुमारे ३ वर्षांत (सन २०११ पर्यंत) पूर्ण करावयाचा होता. त्याअनुषंगाने, कंत्राटदारास टप्पा - १ वडाळा ते चेंबूर या मार्गिकेच्या कार्यान्वयन व देखभालीसाठी खालीलप्रमाणे प्रति फेरी रक्कम देण्याचे निश्चित केले होते (सन २०११ ते सन २०१३) :-

| अ. क्र. | कार्यान्वयन व देखभालीचा कालावधी (वर्षे) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष | २५६४/- |
| २ | द्वितीय वर्ष | ३१३१/- |
| ३ | तृतीय वर्ष | ३७९०/- |

परंतु, मोनोरेल टप्पा - १ वडाळा ते चेंबूर ही मार्गिका दिनांक २ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवाशी वाहतुकीसाठी खुली करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने कंत्राटदारास वरील प्रमाणे प्रति फेरी रक्कम देण्यात आली (माहे फेब्रुवारी, २०१४ ते जानेवारी, २०१७).

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे. लार्सन ॲन्ड टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया या समुहाला मूळ कंत्राटाप्रमाणे संपूर्ण मोनोरेल प्रकल्प पूर्ण करून सलग ३ वर्षे कार्यान्वयन व देखभाल करणे अपेक्षित होते. परंतु, मोनोरेल टप्पा २ वडाळा ते संत गाडगे महाराज चौक या मार्गिकेचे स्थापत्य व कार्यान्वयनाचे काम वेळेत पूर्ण करण्यास कंत्राटदारास विलंब झाला. त्या कारणाने माहे जानेवारी, २०१७ नंतर मोनोरेल टप्पा - १ वडाळा ते चेंबूर या मार्गिकेचे कार्यान्वयन व देखभालीचे काम चालू ठेवण्याकरीता कंत्राटदाराने मोनोरेलच्या प्रति फेरीमागे वाढीव दराचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला होता.

महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर प्रस्तावाची छाननी करण्यासाठी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर वाढीव दराबाबत निर्णय घेण्याकरीता बैठकी घेण्यात आल्या होत्या. समितीच्या शिफारसी प्रमाणे कंत्राटदारास मोनोरेल प्रकल्पाच्या टप्पा -२ ची सेवा सुरु होईपर्यंत, टप्पा - १ - वडाळा ते चेंबूर या मार्गिकेसाठी प्रति फेरीमागे एकूण रु. ४,६२४/- इतका वाढीव दर देण्यात आला. परंतु, सदर दरवाढ ही कंत्राटदाराच्या अपेक्षेप्रमाणे कमी असल्याकारणाने, कंत्राटदाराने निषेधा अंतर्गत स्विकारली. दरम्यान, संत गाडगे महाराज चौक – वडाळा – चेंबूर या संपूर्ण मार्गिकेदरम्यान मोनोरेल सेवा प्रवासी वाहतुकीकरीता पुन:श्च सुरु करण्याकरीता कंत्राटदाराने माहे मार्च, २०१८ रोजी प्रति फेरी रु. १८,०००/- इतक्या दराची मागणी केली होती.

.. २०/-

सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याकरीता प्राधिकरणामार्फत अंतर्गत समिती नेमण्यात आली. परंतु, कंत्राटदाराने समितीला आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करून न दिल्याने सदर समितीस कोणताही निष्कर्ष काढता आला नाही.

महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, कंत्राटदाराच्या प्रस्तावास योग्य, वाजवी तथा रास्त दर देण्याच्या दृष्टीने श्री. एस. के. जैन, माजी सदस्य, भारतीय रेल्वे बोर्ड यांची एक मनुष्य समिती म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्री. एस. के. जैन यांनी दिनांक १४ ते १६, ऑगस्ट, २०१८ दरम्यान मोनोरेल प्रकल्पास भेट दिली व मोनोरेल प्रकल्प अधिकारी, कंत्राटदार व सल्लागार यांच्याशी प्रदीर्घ चर्चा करून आपला अहवाल प्राधिकरणास सादर केला. सदर अहवालामधील प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत :-

- **<u>समितीची कार्यवाही:</u>**

श्री. एस. के. जैन यांनी मोनोरेल प्रकल्प अधिकारी, कंत्राटदार व सल्लागार यांच्याशी प्रदीर्घ चर्चा करून प्रकल्पाची सद्यस्थिती समजून घेतली. तसेच प्राधिकरणामार्फत मोनोरेल प्रकल्पाच्या कार्यान्वयन व देखभालीकरीता चालू असलेल्या निविदा प्रक्रीयेबाबत अवगत करण्यात आले. तसेच, सदर निविदेमधील अटी व शर्ती आणि प्रति फेरीमागे लागणाऱ्या खर्चाबाबत तुलना करताना येणाऱ्या अडचणी समितीसमोर ठेवण्यात आल्या.

- **<u>समितीचे निरीक्षण व शिफारशी</u>**

  - समितीच्या मते कंत्राटादारास पुढील ३ वर्षाकरीता संभाव्य प्रति फेरी दर मूळ कंत्राटाचा विचार न करता या दरवाढीस कंत्राटदाराच्या मागील ३ वर्षाच्या अनुभवाच्या अनुषंगाने नवीन कराराप्रमाणे हाताळणे योग्य होईल.
  - तसेच मोनोरेल सारखे प्रकल्प जगामध्ये खूप कमी असल्याने व भारतामध्ये प्रथमच राबविण्यात येत असल्याने कंत्राटदार सदर प्रकल्पाचे योग्य मूल्यांकन करण्याच्या स्थितीत नसल्याचे समितीचे मत आहे.
  - ३ वर्षाच्या कंत्राटाप्रमाणे कार्यान्वयन व देखभालीकरीता एकूण रु. १७९ कोटी इतकी तरतूद होती, सदर रक्कम संपूर्ण कंत्राट रक्कमेच्या फक्त ७% इतकी आहे आणि या दरावर आधारीत दरवाढ १० वर्षानंतर विचारात घेणे योग्य नाही.
  - समितीने कार्यान्वयन व देखभालीबद्दल विविध पर्यायांचा तपास केला व असा निष्कर्ष काढला की, कंत्राटदारास देण्यात येणारा संभाव्य प्रति फेरी दर मूळ कंत्राटाच्या अधिन न राहता लवकरात लवकर देण्यात यावा.

- तसेच सदर मोनोरेल प्रकल्प प्राधिकरणाद्वारे भविष्यकाळात ताब्यात घेण्यात येईल, त्याअनुंषगाने कंत्राटदाराने कार्यान्वयन व देखभालीकरीता लागणारे मनुष्यबळ कमी करण्याच्या नवीन पध्दतींचा अवलंब करणे योग्य राहील. याव्यतिरिक्त प्राधिकरणाद्वारे प्रकल्पाच्या काही पायाभूत सुविधेकरीता भांडवल गुंतवणूक होत असल्यास त्याचा फायदा प्रति फेरी दर निश्चित करताना प्राधिकरणास होणे अपेक्षित आहे.
- समितीने असे सुचविले की, प्राधिकरण सदर प्रकल्पास लागणाऱ्या इतर सेवांचे स्वरुप व तपासणी औद्योगिक खर्च आणि किंमत केंद्राने (Bureau of Industrial Cost and Pricing) ठरवून दिलेल्या मापदंडाप्रमाणे करु शकतो.
- समितीने सद्यस्थितीत विविध मेट्रो प्रकल्पास लागणाऱ्या खर्चाचा अभ्यास केला असता, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पो. (DMRC) प्रकल्पाच्या कार्यान्वयन व देखभालीकरीता प्रति कि.मी. रु. ७.५ कोटी इतका खर्च होतो. तसेच मुंबई मेट्रो प्रकल्प -१ (MMOPL) द्वारे कार्यान्वयन व देखभाल कंत्राटदाराला साधारणतः प्रति कि.मी. रु. ८ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात येते. त्याअनुषंगाने, मोनोरेल प्रकल्पाच्या १० कि.मी. मार्गिकेकरीता आणि प्रति दिन २७० फेऱ्यांसाठी सुमारे रु. ५.२२ कोटी प्रति कि.मी. इतका खर्च अपेक्षित आहे.
- प्राधिकरणाच्या निविदा प्रक्रियेत कार्यान्वयन व देखभालीकरीता निविदाकर्त्यांनी मागणी केलेल्या रक्कमेच्या आधारे प्रति फेरी मागे रु. ११,१२६/- इतका खर्च अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त मुंबई मोनोरेल प्रकल्पाची क्षमता व त्यासाठी कार्यान्वयन व देखभाल, मनुष्यबळ, सुटे भाग (spare parts), उपभोग्य वस्तू (consumables), इत्यादी बाबींवर लागणारा खर्च इत्यादीनुसार समितीने कंत्राटदारास देय असलेला मोनोरेलचा प्रति फेरी दर ठरविला आहे.

वरील बाबींचा विचार करुन समितीने मोनोरेल प्रकल्पाच्या कार्यान्वयन व देखभालीकरीता पुढील ३ वर्षाकरीता प्रति फेरीमागे एकूण रु. १०,६००/- इतका दर प्रस्तावित केला आहे.

महानगर आयुक्तांनी असे नमूद केले कि, समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने मे. लार्सन ॲन्ड टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया या समुहाला, कार्यान्वयन व देखभालीकरीता दिनांक १ सप्टेंबर, २०१८ पासून प्रति फेरीमागे रु.१०,६००/- इतका दर देण्यासंबंधी दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी कळविण्यात आले आहे.

मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे विचारले की, समितीच्या शिफारशीप्रमाणे मोनोरेलच्या प्रति फेरीस सदर दर हा पुढील ३ वर्षांकरीता कायम राहणार आहे का? यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर वाढीव दर हा दिनांक ०१ सप्टेंबर, २०१८ पासुन माहे मार्च, २०१९ पर्यंत वैध असेल.

**निर्णय:-** **त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>**ठराव क्र. १३६१**</u> **:-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे, मुंबई मोनोरेल प्रकल्पाच्या कामासाठी नेमणूक केलेल्या कंत्राटदार, मे. लार्सन अॅन्ड टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया या समुहाला मोनोरेल प्रकल्पाच्या कार्यान्वयन व देखभालीकरीता दिनांक १ सप्टेंबर, २०१८ पासून प्रति फेरीमागे रु.१०,६००/- इतका दर देण्याकरीता मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

******

**(जोडपत्र)**

जोडपत्र

## प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५९वी बैठक

**दिनांक : ०५ सप्टेंबर, २०१८**

**: ठ रा व :**

"श्री. द. म. सुकथनकर हे दिनांक २५ ऑगस्ट, १९९५ ते दिनांक २१, फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य होते. या काळात श्री. सुकथनकर यांनी केलेल्या कार्याचा कार्यकारी समिती गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे.

************